संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती

# श्रीराम कला महिला महाविद्यालय

# धामणगाव रेल्वे

2018 - 2019

बी.ए. भाग - 2

## पर्यावरण क्षेत्रभेट अहवाल

## जाळीचा मारुती

सादरकर्ती

कु. ........................................

बी.ए. भाग – 2

| मार्गदर्शक | मार्गदर्शक | मार्गदर्शक |
|---|---|---|
| डॉ. गणेश टाले | प्रा. डी.एम. वूईके | प्रा. ए. पी. दोड |
| प्राचार्य | पर्यावरणशास्त्र | भूगोल विभाग प्रमुख |

Scanned by CamScanner

श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे

# ऋणनिर्देश

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ बी.ए .भाग 2 च्या पर्यावरणशास्त्र या विषयाच्या अभ्यासक्रमात क्षेत्रभेटीचा समावेश केला आहेत .याद्वारे वनपरिसंस्था, गवताळ परिसंस्था ,जल परिसंस्था यांचा अभ्यास केला जातो. श्रीराम कला महिला महाविद्यालया द्वारे पर्यावरण क्षेत्र भेटीसाठी अमरावती जिल्ह्याच्या धामणगाव तालुक्यातील जाळीचा मारुती या गवताळ परिसंस्थेची अभ्यास भेटीसाठी निवड करण्यात आली.दिनांक 23 जानेवारी 2019 रोजी बी.ए. भाग 2 च्या सर्व विद्यार्थिनींनी जाळीचा मारुती परिसरातील टेकडीला व लगतच्या गवताळ प्रदेशाला भेट दिली.

या पर्यावरण क्षेत्रभेटीसाठी श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री अरुण भाऊ अडसड, संस्थेचे सचिव श्री.घनश्यामजी मेश्राम सर,स्थानिय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. अशोक भाऊ पनपालीया यांनी परवानगी दिली याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानने गरजेचे ठरते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश टाले, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.एन.एम विहाडे ,प्रा.ए.पी दोड यांनी यामध्ये अभ्यास भेटीचे आयोजन केले केले. या गवताळ परिसंस्थेच्या ठिकाणी गव्हानिपाणी ग्रामस्थांनी मोलाचे मार्गदर्शन केले. याबद्दल या सर्वांचे आम्ही मनपूर्वक आभार मानतो.

सर्व विद्यार्थीनी

बि.ए.भाग-2

श्रीराम कला महिला महाविद्यालय

धामणगाव (रेल्वे)

Scanned by CamScanner

# क्षेत्र भेट - जाळीचा मारोती




Scanned by CamScanner

# जाळीचा मारोती गवताळ परिसंस्था

आम्ही बी.ए. भाग - 2 च्या विद्यापीठ अभ्यासक्रमानुसार जाळीचा मारुती या गवताळ परिसंस्थेत रविवार दिनांक 23 जानेवारी 2019 रोजी भेट दिली.तेथे पर्यावरणीय दृष्ट्या परिसंस्थेचा जवळून अभ्यास केला. त्यातील नोंदी पुढील प्रमाणे आहेत.

**स्थान -**

अक्षवृत्तीय 20°, 45 " उत्तर अक्षवृत्त

रेखावृत्तीय 78°, 13 "पूर्व रेखावृत्त

**महाविद्यालयापासून अंतर** - महाविद्यालय पासून उत्तरेस 13 कि.मी. वर या टेकड्यांचा भूभाग आहे.

**समुद्रसपाटीपासून उंची** - 300 मी.उंचीवर या टेकड्या आढळतात.

**पर्जन्यवृष्टी-** 90 से.मी.

आम्हाला येथे अनेक प्रकारचे वृक्ष लतावेली दिसल्या. या चिंच, कडुनिंब ,पिंपळ ,आंबा, बाभूळ साग, जास्वंद, कनेर, गुलमोहर ,जांभूळ, उंबर इत्यादी वृक्षांचा समावेश यात होतो. याशिवाय अनेक फुलांची झाडे,काटेरी वृक्ष दिसून आले.

या परिसरात या विविध वनस्पती पासून निरनिराळी वनौषधे बनवली जातात. कंदमुळे गोळा केली जातात. काही झाडावरील मधमाशांच्या पोळया पासून सहद गोळा करण्यात येते. येथे सर्वत्र गवताचे आच्छादन दिसत. या गवताचा वापर जनावरांना पाळीव प्राण्यांना चारा म्हणून केला जातो. तसेच काही घरांच्या छपरासाठी या गवताच्या पेंड्यांचा यांचा वापर केला जातो. या भागात पळसाचे ही भरपूर झाडे आहेत.त्यापासून पत्रावळी, द्रोन

Scanned by CamScanner

यासारखे गृहोपयोगी उत्पादने तयार केली जातात. पळसाच्या फुलांपासून धुलीवंदना साठीचा नैसर्गिक रंग तयार करण्यात येतो. ही उत्पादने पर्यावरण दृष्ट्या अतिशय उपयोगी आहे.

त्या पासून मानवी आरोग्याला कुठलीही हानी पोहोचत नाही. परिसरातील कडुनिंब, बाबुड या झाडावर डिंक निर्मिती करून तो गोळा केला जातो व बाजारात विक्रीस पाठविला जातो.

या परिसरात भरपूर गवत असल्याने त्यावर जगणारे अनेक तृण भक्षक प्राणी येथे आढळतात. या परिसरात हरिण , नीलगाय , रोही , गाई बैल , म्हशी , बकरी, मेंढी समा आढळतात. काही व्दितीय भक्षकी येथे आढळतात. उदाहरणार्थ कोल्हा, लांडगा ,बिबट्या ,साप,बेडूक ईत्यादी हे प्राणी तृणभक्षक प्राण्यांना मारून त्यांचे मांस भक्षण करून उदरनिर्वाह करतात. या शिवाय बहुभक्षीय असे चिमणी, कावळा, घार, पोपट, सुतार, घुबड, गिधाड कोकिळा, कबूतर, बगळा मोर, लांडोर,माळढोक,खंड्या इत्यादी आढळतात. तसेच लाखोच्या संख्येने विघटक ज्यात  जिवाणू , बुरशी, विषाणू सूक्ष्मजिव सेंद्रिय पदार्थाचे विघटन करतात व पर्यावरणात संतुलन ठेवण्याचे कार्य करीत असतात.

थोडक्यात येथील परिसरात उत्पादक तृणभक्षक , द्वितीय भक्षक ,तृतीय भक्षक विघटक मोठ्या संख्येने आढळतात. यामुळे परिसंस्था निर्माण होते. अन्न साखळी तयार होते. ऊर्जेचा प्रवाह निर्माण होतो.

जाळीचा मारुती प्रस्तुत पर्यावरण क्षेत्रभेट यासाठी जाळीचा मारोती येथील टेकडीस निवडण्यात आले. या संपूर्ण परिसरात अनेक कमी अधिक उंचीच्या टेकड्या आढळतात. या टेकड्यांना चिरोडीच्या टेकड्या असे म्हणतात.चिरोळीच्या टेकड्या या पोहऱ्याच्या डोंगराचाच एक भाग आहे . या टेकड्यांची समुद्रसपाटीपासूनची सरासरी उंची 300 ते 400 मीटर एवढी आहे.या टेकड्या भूगर्भातील अंतर्गत हालचालीमुळे जमिनीचा काही भाग वर उंचावरून तयार झाला आहे.काही शास्त्रज्ञांच्या मते सुमारे सात कोटी वर्षापूर्वी दख्खनच्या पठारावरील ज्वालामुखी उद्रेकाच्या वेळी येथे ज्वालामुखी विस्फोट होऊन मोठ्या प्रमाणात लाव्हा इतरत्र पसरला आहे .

Scanned by CamScanner

कालांतराने तो थंड होऊन या टेकड्यांची निर्मिती झाली.या टेकडीत बेसाल्ट खडकांचे अवशेष आढळतात. तसेच परिसरातील जमीन काळी कसदार असून ती बेसाल्ट या खडकांपासून तयार झाली आहे. म्हणूनच या भूप्रदेशाचा समावेश दख्खनच्या पठारात केला जातो. पोहत्याचे डोगर हे देशातील महत्त्वाचे जलविभाजक क्षेत्र आहे. कारण या डोंगराच्या पूर्वेकडील बाजूस पडणारे पावसाचे पाणी ,ओहोळ,नाला,उपनदी,नदी,मोठी नदी असे करीत बंगालच्या उपसागराला जाऊन मिळते तसेच पश्चिमेकडून उतारावर पडणारे पाणी अरबी समुद्रात जाऊन मिळते.

या ठिकाणी अनेक टेकड्या असल्याने पाण्याचे लहान-मोठे प्रवाह येथे आढळतात. परंतु उपनदी किंवा नदी येथे आढळत नाही. प्रत्येक टेकडीवरील पावसाचे पाणी लहान गोळयांच्या स्वरूपात उताराच्या ठिकाणी वाहते. येथील जलप्रवाहाच्या वाहण्याची दिशा ही पश्चिम- पूर्व असल्याने हे जलग्रहण क्षेत्र वर्धा नदीचे असून ते सर्व पाणी शेवटी पूर्व वाहिनी नदी द्वारे बंगालच्या उपसागरात गोदावरी नदीत विलीन होते.

या पर्यावरण भेटीसाठी आम्ही बी.ए. भाग - 2 च्या सर्व विद्यार्थिनींनी नियोजन केले. जाळीचा मारुती गावातील नागरिकांच्या भेटी घेतल्या. त्यांना या परिसरातील माहिती विचारली व पर्यावरणीय अवनती बाबत त्यांना जागृत करून पर्यावरणाचा ऱ्हास कसा थांबविता येईल या विषयी चर्चा केली.

Scanned by CamScanner

# उपाय योजना

- या टेकड्यावर विविध घटकांद्वारे मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याची आवश्यकता आहे.

- येथील टेकड्यांवर चर खोदून मातीचे बांध घालून पाणी अडविणे आवश्यक आहे जेणेकरून डोंगरावरील हिरवळ वाढेल .

- गुरेचराई नियंत्रित करून मृदेची धूप कमी करता येईल.

- येथील लहान-मोठ्या जलप्रवाहावर बंधारे निर्माण केल्यास भूजल पातळी उंचावेल व गुराढोरांना, पशुपक्ष्यांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता होईल.

पाणी वाहून न जाता जमिनीत जिरेल.

Scanned by CamScanner

* गाळीचा मारोती गवताळ परिसंस्थेला भेट देतांना श्रीराम कला महिला महा. B.A. II च्या सर्व विद्यार्थिनी.



Principal
Shriram Kala Mahila
Mahavidyalaya
DHAMANGAON Rly.

Scanned by CamScanner